**नि क्र युडब्ल्यू १ (यू.११) श्री अनिरप्पा इरण्णा हुलले**

शपथेवर कथन करतो की;

माझे नाव **श्री अनिरप्पा इरण्णा हुलले** वय. ५४ वर्षे राहणार – सुंदरम नगर; सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि क्र युडब्ल्यू १ (यू.११)** खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**<u>उलटतपासणी सामनेवालेतर्फे श्रीमती. एस.एच.कोकरे, विधिज्ञ यांचेमार्फत,</u>**

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, मी दि.३१.०५.१९९० रोजी सामनेवाले यांचेकडे शिपाई म्हणून कामास लागलो हे दाखविण्याकरिता अभिलेखावर कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. मी शिपाई म्हणून तोंडी आदेशाने त्यावेळचे मॅनेजर श्री सी.पी.पंडीत यांच्या आदेशाने कामास लागलो. हे म्हणणे खरे नाही की, माझी कायम रिक्त जागी नेमणुक झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिक्षा यादीतील उमेदवार नाही. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला जेव्हा जेव्हा काम उपलब्ध होते त्या त्या वेळी काम दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कायम कर्मचारी यांची रजा व गैरहजेरीच्या काळात काम दिले जात असे.

**१३.** आता मला माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र परिच्छेद ५ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर परिच्छेद मध्ये नमूद केलेले परिपत्रक मी रोजंदारी कामगार असल्यामुळे लागू होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे प्रतिज्ञापत्रात कथन केलेप्रमाणे सन १९९० पासून आजअखेर ३२ वर्षे नोकरी केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ३२ वर्षे सेवा केलेबाबत कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे सलग २४० दिवस कधीही भरले नाहीत. साक्षीदार स्वतहून सांगतो की, त्याबाबतची कागदपत्रे दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे प्रतिज्ञापत्रात इतर रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करून त्याची फायदे दिले हे दाखविण्याकरिता कोणत्याही कर्मचा-याचे नाव प्रतिज्ञापत्रात नमूद केले नाही. साक्षीदार

स्वतहून सांगतो की, श्री कुमठेकर, रोजंदारी कर्मचारी क्लार्क म्हणून सन १९९५ मध्ये सेवेत कायम केले. श्री रासणे रोजंदारी कर्मचारी यांना लिपिक म्हणून सन १९९५ मध्ये सेवेत कायम केले. श्री हुलसुरे रोजंदारी कर्मचारी यांना शिपाई म्हणून सन १९९५ मध्ये सेवेत कायम केले. श्री गांधाळे रोजंदारी कर्मचारी यांना शिपाई म्हणून सन १९९५ मध्ये सेवेत कायम केले. हे म्हणणे खरे नाही की, मे २००८ ते जुलै २०१२ पर्यत मी काम केले नाही. साक्षीदार स्वतहून सांगतो की, तोंडी आदेशान्वये मी काम केले.

**१४.** माझेविरुध्द सामनेवाले यांनी अपहाराबाबत फौजदारी न्यायालयात फौजदारी केस केली होती. हे म्हणणे खरे आहे की, जुलै २००८ ते मे २०१२ या कालावधीत रोजंदारी शिपाई म्हणून मी काम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारीत केलेली मागणी चुकीची व अयोग्य आहे.

**१५.** आजरोजी मी कामावर आहे. मला दरवेळी पगाराचे चिठठी दिली जाते.

**उलटतपासणी पूर्ण.**

**फेरतपास काहीही नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

(मु. रा. कुंभार)

सदस्य

औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.

दिनांक.०८.१२.२०२५

*माकम*